# आत्मनिर्भरता, संशोधनाला प्राधान्य

## केंद्र सरकारचे नवे विज्ञान धोरण प्रसिद्ध : आमूलाग्र परिवर्तनाची अपेक्षा

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

केंद्र सरकारने नवे विज्ञान धोरण प्रसिद्ध केले आहे. भारताला स्वयंपूर्ण अर्थात आत्मनिर्भर करणे, वैज्ञानिक आणि तंत्रवैज्ञानिक संशोधनावर भर देण्यात आला आहे. शास्त्रीय आणि तांत्रिक संशोधन अधिक व्हावे यासाठी गुंतवणूक वाढविली जाणार आहे.

या धोरणाचे आशयपत्र (ड्राफ्ट) शुक्रवारी केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने प्रसिद्ध केले. ते या विभागाच्या संकेतस्थळावरही आहे. त्यात सुधारणा सुचविण्याचे तसेच सूचना करण्याचे आवाहन केले आहे. लोकांच्या सूचनांवर विचार करून अंतिम धोरण घोषित करण्यात येईल, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### अत्याधुनिकता, कल्पकता...

- अत्याधुनिक तांत्रिक संशोधनासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित केले जाणार
- वैज्ञानिक, तांत्रिक संशोधन विदा (डाटा) संकलन केंद्र स्थापणार
- संशोधन कार्याची प्रेरणा देणारे शिक्षण सर्व स्तरांमध्ये दिले जाणार
- आतापर्यंतच्या संशोधन कार्याची माहिती देणारे पोर्टल बनविणार

**स्वयंपूर्णता हे ध्येय**

पंतप्रधानांच्या 'आत्मनिर्भरता' धोरणाला अनुसरूनच हे आशयपत्र केले आहे. तंत्रविज्ञान तसेच अन्य वैज्ञानिक क्षेत्रांमध्ये भारत स्वयंपूर्ण बनविणे हे ध्येय आहे.



**अधिक गुंतवणूक करणार**

विज्ञान आणि तंत्रज्ञान संशोधन क्षेत्रात गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर वाढवून संशोधनाला वेग देण्यात येईल. भारताला लहान-सहान वस्तूंचीही आयात करावी लागते. त्यामुळे देशाचा पैसा देशाबाहेर जातो. हे टाळण्यासाठी अत्याधुनिक स्वदेशनिर्मित तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देण्याची योजना आहे. त्या दिशेने जाणारे हे आयशपत्र आहे.

**वैज्ञानिक डाटा संकलन**

वैज्ञानिक संशोधन आणि विज्ञानविषयक इतर बाबींवर विदा (डाटा) संकलन करून मध्यवर्ती यंत्रणेद्वारे ते इच्छुक संशोधकांना पुरविण्याची योजना आहे. यामुळे संशोधकांना संशोधनाची दिशा ठरविणे सुलभ होणार असून वेळ आणि संपत्तीची बचत होऊ शकते.

**लक्ष्यकेंद्री संशोधनं प्रणाली**

देशाची आवश्यकता देशातच भागविण्याचा प्रयत्न हे नव्या विज्ञान धोरणाचे सूत्र आहे, असेही नमूद केले आहे.

**संशोधन शिक्षणाला प्रोत्साहन**

देशात तांत्रिक संशोधकांची संख्या वाढावी यासाठी तशा प्रकारचे शिक्षण मिळेल अशी व्यवस्था केली जाणार आहे. प्रचलित शिक्षणाच्या सर्व स्तरांमध्ये संशोधन शिक्षणाचा समावेश करण्याची योजना आहे. कौशल्य विकास शिक्षणाला संशोधनाची जोड मिळेल अशी व्यवस्था करण्याचा विचार आहे. देशात विविध स्थानी शिक्षण क्षेत्रात संशोधक करण्यासाठी केंद्रे स्थापन करण्यात येतील.

# शिवाजी विद्यापीठ परिसर सर्वसामान्यांसाठी खुला

## सकाळी ६ ते ९ वेळेचे बंधन; शासकीय नियमांचे पालन आवश्यक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ अनुदान आयोग, राज्य शासन व जिल्हा प्रशासन यांचे आदेश, मार्गदर्शक सूचना, विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार सद्यस्थितीत शिवाजी विद्यापीठ परिसर सकाळी ६ ते ९ या वेळेत सर्वसामान्यांना खुला करण्यात येत आहे, असे परिपत्रक विद्यापीठाच्या वतीने काढण्यात आले आहे.

कोव्हिड-१९ च्या अनुषंगाने १५ मार्चच्या परित्रकानुसार विद्यापीठ परिसरात सकाळी व संध्याकाळी फिरावयास येणाऱ्या नागरिकांनी फिरावयास येणे टाळावे, असे कळविण्यात आले होते. विद्यापीठ परिसरात सामान्य नागरिकांना प्रवेश बंदी होती. यासंदर्भात नुकतेच शहर व जिल्हा नागरी कृती समिती व नागरिकांनी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ निदर्शने केली.

विद्यापीठ परिसर सामान्य नागरिकांना फिरावयास खुला करण्याची निवेदनाद्वारे प्रशासनाकडे



मागणी केली होती.

त्याअनुषंगाने विद्यापीठाने गुरुवारी (दि.३१) परिपत्रक काढले आहे. विद्यापीठ परिसरात फिरावयास येणाऱ्या नागरिकांनी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, शासन, जिल्हा प्रशासन आणि शिवाजी विद्यापीठाने वेळोवळी केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना, सूचनांचे काटेकोर पालन करणे गरजेचे आहे. थर्मल स्क्रिनिंग, पूर्ण वेळ मास्क, सामाजिक अंतर, सॅनिटायझरचा वापर करणे आवश्यक असणार आहे, असे परिपत्रकात म्हटले आहे.



पुष्प प्रदर्शन व स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा उद्यान विभागाने ३० गटांत यश मिळविले. या विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी अभिनंदन केले.

# गार्डन क्लब स्पर्धेत विद्यापीठ उद्यान विभागाला विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** येथील गार्डन क्लब आणि राजर्षी शाहू महाराज कृषी महाविद्यालयाने घेतलेल्या सुवर्णमहोत्सवी पुष्प प्रदर्शन व स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचा उद्यान विभाग ४० गटांत सहभागी झाला. त्यापैकी ३० गटांत यश मिळविले. १२ गटांत प्रथम क्रमांक, १२ गटांत द्वितीय क्रमांक आणि ६ गटांत तृतीय क्रमांक पटकावून स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले.

या निमित्त उद्यान विभागाच्या सहकाऱ्यांचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी अभिनंदन केले. यावेळी उपकुलसचिव डॉ. जी. एस. कुलकर्णी, डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अभियांत्रिकी विभागाचे मेस्त्री गणपती मस्ती, उद्यान विभागाचे अधीक्षक अभिजीत जाधव, हेडमाळी संभाजी कांबळे, संजय सोनुले, माळी सुरेश वागवेकर उपस्थित होते.

# ३० प्राध्यापकांना पदोन्नतीद्वारे 'नववर्ष भेट'

## शिवाजी विद्यापीठ : चार वर्षांची प्रतीक्षा संपली

संतोष मिठारी
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने विविध अधिविभागांमधील ३० प्राध्यापकांना सेवांतर्गत प्रगती योजनेअंतर्गत (करिअर अॅडव्हान्समेंट स्कीम (कॅस) पदोन्नती देत नववर्षाची भेट दिली आहे. त्यामुळे या प्राध्यापकांची चार वर्षांची प्रतीक्षा संपली. त्यांच्या शिक्षण आणि संशोधन कार्याला प्रोत्साहन मिळणार आहे.

काही तांत्रिक कारणांमुळे या पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण रखडली होती. त्याचा परिणाम या प्राध्यापकांच्या मानसिकतेवर होता होता. ते एकप्रकारे विद्यार्थी आणि विद्यापीठ विकासाला मारक ठरत होते. ते लक्षात घेऊन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या सूचनेनुसार विद्यापीठ प्रशासनाने रखडलेल्या पदोन्नतीची कार्यवाही लवकर पूर्ण करण्याची कार्यवाही केली. त्यामुळे विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, राज्यशास्त्र आणि इलेक्ट्रॉनिक्स विभागांतील ३० प्राध्यापकांना पदोन्नती देण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

### नववर्षात पदोन्नतीचे वेळापत्रक ठरविणार

दिवाळीपूर्वी 'कॅस'अंतर्गत ३६ प्राध्यापकांना पदोन्नती दिली होती. आता नववर्षाच्या पहिल्या दिवशी ३० जणांना दिली जाणार असल्याचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले. पदोन्नतीमुळे काम करण्यातील हुरूप वाढतो. ज्या-त्या वर्षी पदोन्नती मिळणे महत्त्वाचे ठरते. त्यामुळे प्राध्यापकांच्या पदोन्नतीचे वेळापत्रक नववर्षात विद्यापीठ प्रशासनाकडून ठरविण्यात येईल. त्याची अंमलबजावणी करण्यात येईल, असे ते म्हणाले.

# मनुष्यबळ विकासात नीतीमूल्यांचे महत्त्व असाधारण

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : डॉ. ठकार, डॉ. झारी यांच्या संदर्भग्रंथाचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मनुष्यबळ विकासाच्या क्षेत्रात नैतिक मूल्यांचा संकोच झाल्यास त्याचे दूरगामी दुष्परिणाम होण्याची दाट शक्यता निर्माण होते. म्हणून या संदर्भात नीतीमूल्यांचे असाधारण महत्त्व आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या एमबीए युनिटचे डॉ. एच. एम. ठकार आणि देशभक्त रत्नाप्पा कुंभार वाणिज्य महाविद्यालयातील डॉ. ताहीर झारी यांनी लिहिलेल्या 'एथिकल परस्पेक्टिव्हज ऑफ ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट' या पुस्तकाचे प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, देशातील लोकसंख्येकडे मनुष्यबळाची ताकद म्हणून पाहिले आणि त्यादृष्टीने या मनुष्यबळाचा विकास केला, तिचा योग्य तऱ्हेने विनियोग केला, तर देशाचे चित्र पालटेल. उत्पादन आणि सेवा क्षेत्रामध्ये या मनुष्यबळाचा उत्तम वापर करता येईल. या मनुष्यबळ विकास क्षेत्रात प्रामाणिकपणा, समर्पण वृत्ती आणि नैतिक मूल्यांच्या जोपासनेलाही तितकेच मोठे महत्त्व आहे. त्यांचा संकोच झाल्यास मनुष्यबळावर त्याचा विपरित परिणाम होतोच, पण, उद्योग-व्यवसायांवरही त्याचे दुष्परिणाम होऊ लागतात. याचा देशाच्या भवितव्याशी थेट संबंध असल्याने असा संकोच होणे कोणालाच परवडणारे नाही, याची जाणीव करून देणारा उत्तम संदर्भग्रंथ डॉ. ठकार व डॉ. झारी यांनी निर्माण केला आहे. शोधप्रबंधाचे हे एक उत्तम ग्रंथरुप त्यांनी साकार केले आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, हा संदर्भग्रंथ एमबीएच्या विद्यार्थ्यांसह उद्योग-व्यवसायांत कार्यरत प्रत्येकासाठी मार्गदर्शक आहे. विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षकांनी एकत्र येऊन अशा प्रकारचा उपक्रम हाती घेणे, यालाही वेगळे महत्त्व आहे. भारत मनुष्यबळाच्या बाबतीत आघाडीवर आहे. त्याचा सकारात्मक लाभ आपण घ्यायला हवा, असे सूचित करणारा हा ग्रंथ आहे. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव व ज्येष्ठ विधिज्ञ व्ही. एन. पाटील, गणित अधिविभाग प्रमुख डॉ. सरिता ठकार, डॉ. केदार मारुलकर, डॉ. दीपा इंगवले, डॉ. अनुप मुळे आदी उपस्थित होते. डॉ. एच. एम. ठकार यांनी पुस्तकाचा परिचय करून दिला. डॉ. झारी यांनी आभार मानले.

# विद्यापीठास सर्वसाधारण विजेतपद

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : गार्डन क्लब व राजर्षी शाहू महाराज कृषी महाविद्यालयातर्फे झालेल्या पुष्प प्रदर्शन व स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या फुलांना व उद्यानांना सर्वसाधारण विजेतेपद मिळणे म्हणजे कोल्हापूर शहराच्या फुफ्फुसाची देखभाल करणाऱ्या श्रमिकांचा सन्मान आहे, अशी प्रतिक्रिया कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

सुवर्णमहोत्सवी पुष्प प्रदर्शन व स्पर्धेत विद्यापीठाचा उद्यान विभाग ४० गटांत सहभागी झाला. त्यापैकी ३० गटांत यश मिळविले. १२ गटांत प्रथम, १२ गटांत द्वितीय आणि ६ गटांत तृतीय क्रमांक पटकावून स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

या निमित्त उद्यान विभागाच्या सहकाऱ्यांसाठी कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत चहापान झाले. त्यावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'पूर्वी पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे इच्छा असूनही उद्यानाच्या देखभालीत अडचणी येत. मात्र, आता पाण्याच्या अनुषंगाने विद्यापीठ परिसर स्वयंपूर्ण झाल्यामुळे उद्यान विभागाला पाण्याची योग्य तऱ्हेने उपलब्धता होत आहे.' उपकुलसचिव डॉ. जी.एस. कुलकर्णी, डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, अभियांत्रिकी विभागाचे मेस्त्री गणपती मस्ती, उद्यान विभागाचे अधीक्षक अभिजीत जाधव, हेडमाळी संभाजी कांबळे, हेडमाळी संजय सोनुले, माळी सुरेश वागवेकर उपस्थित होते.



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासमवेत उद्यान अधिकारी, कर्मचारी गार्डन क्लब स्पर्धेत प्राप्त केलेल्या प्रमाणपत्रे व ट्रॉफीसह. शेजारी अभिजित जाधव, गणपती मस्ती, डॉ. व्ही.एन. शिंदे, संभाजी कांबळे, संजय सोनुले, सुरेश वागवेकर, व्ही.टी. पाटील, डॉ. जी.एस. कुलकर्णी.

शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी सहाय्यता कक्ष : अधिसभेत मंजुरी

# गुणवत्तापूर्ण अधिविभागांना मिळणार 'स्वायत्ता'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शैक्षणिक, संशोधनात्मक उत्कृष्ट व गुणवत्तापूर्ण अधिविभागांना 'स्वायत्त अधिविभाग' हा दर्जा मिळणार आहे. परगावाहून विविध कामासाठी येणारे विद्यार्थी, पालकांसाठी विद्यापीठात केंद्रीय विद्यार्थी सहाय्यता कक्ष उभारला जाणार आहे. त्याबाबतचे ठराव विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये झाले आहेत.

विद्यापीठात बुधवारी झालेल्या अधिसभेमध्ये एकूण ४७ ठराव मांडण्यात आले. त्यापैकी ८ ठरावांना मान्यता देण्यात आली, तर ३९ ठराव मागे घेण्यात आले.

यावेळी मंजूर ठरावांमध्ये विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी रायफल शुटिंग रेंज आणि ऑबस्टॅकल ट्रॅक तयार करणे, विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांमधील प्रशासकीय सेवक अथवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पीएचडी पदवी प्राप्त केल्यास त्यांना प्रोत्साहनपर मानधन म्हणून अर्थसहाय्य देण्याची योजना सुरू करणे, विद्यापीठाशी संलग्न प्रत्येक महाविद्यालयातून अनेकवेळा विद्यार्थ्यांना विद्यापीठात त्यांच्या कामासंबंधी पाठविले जाते, ते टाळण्यासाठी संलग्नित प्रत्येक महाविद्यालयात विद्यार्थी सुविधा केंद्र सुरू करावे.

प्राध्यापक पद मंजूर असूनही ज्या संलग्न महाविद्यालय, संस्थेकडून या पदावरील निवडीबाबतचे प्रस्ताव विद्यापीठाकडे प्राप्त झालेले नाहीत, अशा महाविद्यालयाकडून हे प्रस्ताव तातडीने मागवून घेत मंजूर प्राध्यापक पदावर नेमणुका, निवडी होणे यांचा समावेश आहे.

## प्रबोधनाचे कार्यक्रम घ्यावेत

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत विद्यार्थी, पालक, नागरिकांचे प्रबोधन करण्यासाठी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये कार्यक्रम घ्यावेत. राज्य शासनाने विद्यापीठांसाठी तयार केलेले सर्व एकरूप परिनियम पुस्तक स्वरूपात अथवा संकेतस्थळावर सर्वांना उपलब्ध करून द्यावेत, या ठरावांचाही समावेश आहे. मंजूर झालेले ठराव श्रीनिवास गायकवाड, पंकज मेहता, दिनेश जंगम, इला जोगी, महेश निलजे, एस. डी. डेळेकर यांनी मांडले आहेत.



मंजूर ठरावांची संख्या एकूण ठरावांच्या तुलनेत कमी असली, तरी विद्यार्थी, प्राध्यापक आणि विद्यापीठ विकासाच्यादृष्टीने ते महत्त्वपूर्ण आहेत. ठराव हे विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद, अभ्यास मंडळांकडे जातील. या अधिकार मंडळांकडून संबंधित ठरावांच्या अंमलबजावणीची कार्यवाही लवकर व्हावी.

- संजय जाधव, अधिसभा सदस्य